ePaper

# मुंबईत पोहोचताच राहुल गांधींचा PM मोदींवर हल्लाबोल



| वर्ष - 7 | अंक - 119 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार , दिनांक 1 सप्टेंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- 'उद्धव' टोमणेबाज म्हणून नावारूपाला आले !
- पीएमपीच्या ताफ्यात नव्या बसेस!
- सुप्रीम कोर्टाच्या नावे फेक वेबसाइट!

# भाजपाची अपरिहार्यता!


## »स्थानिक प्रभावी चेहऱ्याला हवी ताकद: राजकीय वर्चस्व राखण्याचे आव्हान

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**एकेकाळी बलाढ्य राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला धूळ चारत पुणेसह पिंपरी-चिंचवड महापालिकेत २०१७ मध्ये भाजपाने 'कमळ' फुलविले. दोन्ही महापालिकांतर्गत पक्ष बळकट करण्यात आला. मात्र, सध्याच्या राज्यातील राजकीय बदलाने त्याचा थेट परिणाम पक्षातील स्थानिक नेत्यांवर, कार्यकर्त्यांवर होताना दिसत आहे. दोन्ही महापालिकेत उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या समर्थकांचा हस्तक्षेप वाढला आहे. त्यांचा 'सॉफ्ट टार्गेट' भाजपा ठरत आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीसाठी आगामी निवडणुकीत महाविकास आघाडी नव्हे, तर अजित पवार यांच्या महायुतीतील 'कुस्तीला' सामोरे जावे लागणार आहे.**





पुणे जिल्ह्यात अजित पवार यांचे वर्चस्व आहे. त्यातच पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यापेक्षा अजित पवार कधिही उजवे असल्यामुळे प्रशासनावर प्रचंड पकड निर्माण झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात भाजपा प्रभावी चेहऱ्याची अरिहार्यता दिसून येत आहे. राष्ट्रवादीच्या सत्ता सहभागाने तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाविषयी तयार झालेल्या भावनिक लाटेमुळे पुणे- पिंपरी-चिंचवडमध्ये राजकीय वर्चस्व राखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. भाजपा पक्षश्रेष्ठींकडून स्थानिक नेत्यांना ताकद देण्याची आवश्यकत निर्माण झाली आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये २०१४ नंतर भाजपाची ताकद वाढल्यानंतर राष्ट्रवादी 'बॅकफुट'वर फेकली गेली. भाजपाने शहरात आपली पाळेमुळे घट्ट रोवली. राज्यातील पदाधिकाऱ्यांचेही दौरे वाढले. सध्या उपमुख्यमंत्री अजित पवार गटाने भाजपाशी जुळवून घेतल्याने भाजपा पदाधिकाऱ्यांना पुन्हा नवीन आव्हान उभा राहिले आहे. प्रतिस्पर्धी असणाऱ्या राष्ट्रवादीच सत्तेत आल्याने भाजपा पदाधिकारी कोंडीत पकडण्याचे काम केले जात आहे. परिणामी, त्याचा पक्ष वाढीवर परिणाम जाणवत आहे. भाजपाच्या काळात झालेल्या विकासकामांची चौकशी करू असा दम अजित पवार यांनी भरल्याने भाजपाच्या गोटात अस्वस्थता आहे. तर प्रत्येक कामात राष्ट्रवादीने लक्ष घातल्याने भाजपात नाराजीचा सूर उमटत आहे. पुण्यात पालकमंत्री चंद्रकांत पाटील, माजी महापौर मुरलीधर मोहोळ, आमदार माधुरी मिसाळ अशा दिग्गज नेत्यांची कोंडी झाली आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये आमदार महेश लांडगे एकाकी भूमिकेत आहेत. याबाबत भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी गांभीर्याने लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. एका बाजूला राष्ट्रवादीचे आव्हान पेलताना दुसरीकडे भाजपाला शिवसेनेशी देखील सामना करावा लागणार आहे. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला भावनिक लाटेचा फायदा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला सोबत घेऊन भाजपाविषयी लोकांमध्ये नाराजी असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. त्यामुळे शिवसेनेला थोपविण्यासाठी रणनीती आखावी लागणार आहे.

### पक्षातील पदाधिकाऱ्यांची मर्जी सांभाळण्याची कसरत...

**» पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात भाजपाचे अनेक पदाधिकारी नाराज असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. हे नाराज पदाधिकारी पक्ष सोडून जातील अशा चर्चा होत आहेत. या चर्चांवर शिक्कामोर्तब देखील होताना दिसत आहे. काही पदाधिकारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीत दाखल झाले आहेत. तर काहींनी आपल्या वाढदिवस अथवा विविध कार्यक्रमाच्या फ्लेक्सवर भाजपा पक्षाचा उल्लेख टाळला आहे. त्यामुळे आगामी काळात पक्षातील पदाधिकाऱ्यांची मर्जी सांभाळून त्यांना पक्षातच ठेवण्याची कसरत नेत्यांना करावी लागणार आहे.**

### राष्ट्रवादीचा हस्तक्षेप रोखण्याचे आव्हान...

**»राज्यातील सत्तेत उपमुख्यमंत्री अजित पवारांनी आपल्या गटासह प्रवेश केल्याने भाजपाचे काही पदाधिकारी नाराज झाल्याचे पाहायला मिळत आहे. उपमुख्यमंत्री पवार आणि स्थानिक राष्ट्रवादीचे नेते जाणीवपूर्वक राष्ट्रवादीला टार्गेट करताना दिसत आहे. त्यामुळे भाजपातील पदाधिकाऱ्यांची काम करण्याची गोची झाल्याचे पाहायला मिळत आहे. पक्षातील कार्यकर्त्यांचे मनोबल वाढवायचे असेल तर आगामी काळात राष्ट्रवादीचा हस्तक्षेप रोखण्याचे आव्हान भाजपा समोर असणार आहे.**

---

# वैष्णवी शिंगोटेला सर्वोत्कृष्ट मुष्टियोद्धाचा सन्मान!

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त निमंत्रित मुष्टियुद्ध स्पर्धेचे दापोडी मध्ये आयोजन करण्यात आले होते. महिलांनी स्वतःचे रक्षण स्वतः करण्यासाठी व आपल्या शरीरामध्ये ताकद निर्माण करण्याच्या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. पुणे जिल्हा मुष्टियुद्ध संघटनेचे माजी सेक्रेटरी लोकेंद्र पेनोली यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांना पुष्पहार घालून स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ट मुष्टियोद्धा हा बहुमान वैष्णवी शिंगोटेला मिळाला.



या स्पर्धेमध्ये मेजर ध्यानचंद क्रीडा गौरव पुरस्कार 2023 सचिन शिंगोटे, सुरेश साळवी, सुरज साळुंके, प्रदीप शिंदे, जयकुमार शिंदे, श्रीधर तंबा यांना मिळाला. डॉ. मदन कोठुळे व सुरज साळुंके यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

### महिला विजेते खेळाडू

**»या वेळी महिला विजेते खेळाडू स्नेहल कांबळे, सानवी लोखंडे, आर्या डोके, साक्षी पाटील, श्रावनी राठोड, निर्मिती यातले, धनश्री शिंदे, आकांक्षा मोहिते, स्वरा सोमवंशी, वैष्णवी शिंगोटे, वेदांती मुने, अन्वी हंडे, तन्वी गव्हाणे, सोहरा खान, अनुराधा फुगे, चैत्राली लांडगे, अद्विका येवले आदी महिलांनी विजेतेपद मिळवले. देवेंद्र सिंग यादव, विजय भिकोले, सदानंद साबळे, सुरेश साळवी आदींनी पंच म्हणून काम पाहिले.**

# पीएमपीच्या ताफ्यात नव्या बसेस येणार!

## स्वमालकीच्या 100 सीएनजी बसेस खरेदी करणार, मासिक पासबाबत मोठा निर्णय

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी) संचालक मंडळाच्या बैठकीत स्वमालकीच्या १०० सीएनजी बस घेण्याचा निर्णय घेण्यात आला. दोन्ही महानगर पालिका पीएमपीला १०० बस खरेदी करून देण्यात आहेत. तसेच, पीएमपीच्या मिळकती व डेपो येथे व्यापारी उद्देशाने विकसित करण्याचे पूर्ण अधिकार पीएमपीच्या अध्यक्षांना देण्यात आले आहेत.**




पीएमपीच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवारी पीएमपीच्या मुख्यालयात पार पडली. यावेळी पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंग, पीएमपीचे अध्यक्ष सचिंद्र प्रताप सिंह, सीआयआरटीचे संचालक टी सुर्याकिरण, पीएमआरडीएचे आयुक्त राहूल महिवाल, पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी संजीव भोर आणि पीएमपीचे सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर उपस्थित होते. या संचालक मंडळाच्या बैठकीत एकूण १५ विषय ठेवण्यात आले होते.

त्यामध्ये प्रामुख्याने पीएमपीला स्वमालकीच्या बसची आवश्यकता असल्याचे पीएमपीच्या अध्यक्षांनी सांगितले. तसेच, पीएमपीकडून सुरू असलेल्या योजना, वाढते उत्पन्न व प्रवास संख्या याची माहिती संचालक मंडळास देण्यात आली. यावेळी संचालक मंडळाने पीएमपीला १०० स्वमालकीच्या बस खरेदीस मान्यता दिली. दोन्ही महापालिका सीएनजी बस खरेदी करून देणार आहेत.

### पीएमआरडीच्या हद्दीत पीएमपीचा पास

**» पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत पीएमकडून सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यासाठी पीएमआरडीकडून त्याचा वाटा म्हणून पीएमपीला निधी देखील दिला जात आहे. त्यामुळे पीएमपीने आता पीएमआरडीएच्या हद्दीत देखील त्यांची पासची सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत पुणे शहर आणि पिंपरी-चिंचवडकरांनाच पीएमपी प्रवासासाठी मासिक पास दिला जात होता. या निर्णयामुळे पीएमआरडी हद्दीतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्या पासची रक्कम किती असेल हे अद्याप ठरविण्यात आलेले नाही.**

**» दरम्यान, पीएमपीएमल त्यांच्याकडील ५०० चालकांना ई बस चालवण्याचं प्रशिक्षण देणार आहे. यामुळं आगामी काळात संप झाल्यास पीएमपीएमएलचे चालक ई बस चालवू शकणार आहेत. यामुळं प्रवाशांना त्रास होणार नाही.**

---

# ढोलपथकांच्या कर्णकर्कश आवाजामुळे पुणेकरांचे आरोग्य धोक्यात

## » प्रॅक्टिसच्या जागांवर निर्बंध येणार?: स्थानिकांची मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील भिडे पुलासह सिंहगड रस्ता, कात्रज, कर्वेनगर अशा विविध भागांत ढोल-ताशांचे आवाज घुमू लागले आहेत. वादकांना सुखावणारे हे आवाज स्थानिकांसाठी मात्र डोकेदुखी ठरू लागले आहेत. या कर्णकर्कश आवाजांमुळे ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांच्या कानठळ्या बसून कानाच्या विकारांचा धोकाही वाढला आहे. त्यामुळे ढोल-ताशा पथकांना रहिवासी क्षेत्र वगळून सराव करण्याची सक्ती करावी आणि त्यांच्यावर निर्बंध घालावेत, अशी अपेक्षा स्थानिकांकडून करण्यात येत आहे.**



### नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दररोज सायंकाळी सहा वाजल्यानंतर ढोल-ताशांचे आवाज घुमण्यास सुरुवात होते. एस. एम. जोशी पूल, भिडे पूल, ओंकारेश्वर मंदिरापर्यंतच्या नदीपात्रात रस्त्याच्या कडेला ढोल-ताशा मंडप घालून सराव करण्यावर पथकांचा भर आहे. या आवाजामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. त्यामुळे पथकांनी वाद्यांची संख्या मर्यादित ठेवावी, रहिवासी क्षेत्राव्यतिरिक्त मोकळ्या जागेत सराव करावा, शाळांच्या मैदानावर होणाऱ्या सरावांना मर्यादा असावी, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. सायंकाळी नागरिक दमून घरी येतात. मुलांच्या शाळा सुटल्याने त्यांची अभ्यासाची वेळ असते, दरम्यान सराव सुरू होत असल्याने चिडचिड होत असून, मोठ्याने बोलण्याची वेळ आल्याचेही ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले.

### पुणेकर काय म्हणतात?

ढोल वादनातील कलात्मकतेपेक्षा कोणत्या पथकाचा आवाज मोठा येईल, यासाठी जोरजोरात वादन करण्यात येते. घरामध्ये मोठ्या प्रमाणावर आवाज येत असल्याने ज्येष्ठ नागरिक, लहान मुले यांना त्रास होत आहे. त्यामुळे ढोल पथकांनी परिसरातील नागरिकांचा विचार करून काळजीपूर्वक सराव केला पाहिजे. असेही काही पुणे करांचे म्हणणे आहे.

---

# रक्षाबंधनासाठी जात असताना कारचा टायर फुटला; गाडी खडकवासला धरणात बुडाली

। पुणे । महाईन्यूज ।

पुणे-पानशेत रस्त्यावरील कुरण बुद्रुक गावच्या हद्दीत कारचा टायर फुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटले व कार थेट खडकवासला धरणाच्या पाण्यात कोसळल्याची धक्कादायक घटना बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास घडली आहे. या अपघातात १२ वर्षीय मुलीचा मृत्यू झाला आहे. तर स्थानिक नागरिकांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे चौघांचे प्राण वाचले.

संस्कृती सोमनाथ पवार (वय १२, रा. नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे) हिचा मृत्यू झाला आहे. रात्री उशिरा या मुलीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला आहे. वेल्हे पोलिसांनी या घटनेत आकस्मित मृत्यूची नोंद केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नांदेड सिटी येथे राहणारे सोमनाथ पवार हे बुधवारी सायंकाळी सातच्या सुमारास



रक्षाबंधनासाठी पत्नी अर्चना, मुलगा प्रद्युम्न, मुलगी संस्कृती व बहीण सुनीता नारायण शिंदे यांसह कारने पानशेत या आपल्या मुळ गावी जात होते. कुरण बुद्रुक गावच्या हद्दीत माऊलाई मंदिराजवळ अचानक पवार यांच्या कारचे उजव्या बाजूचे टायर फुटल्याने त्यांचे कारवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे भरधाव वेगात असलेली कार थेट खडकवासला धरणाच्या पाण्यात कोसळली.

गाडी जोरात धरणात कोसळल्याने आवाज ऐकून आजूबाजूला असलेले स्थानिक मदतीसाठी घटनास्थळी धावले.

# पिंपळे सौदागरमधील नैसर्गिक नाले बुजविले!

## » पूरस्थितीचा धोका : नाले बुजवून उभारल्या इमारती व रस्ते

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सिमेंटचे पाइप टाकून पिंपळे सौदागर परिसरातील नैसर्गिक नाले बुजविले आहेत. त्यावर इमारती व रस्ते उभारले आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी नदीला न जाता परिसरात साचून पूर परिस्थिती निर्माण होते. दोन वर्षांपूर्वी पी. के. चौक ते कोकणे चौकादरम्यान बीआरटी मार्गावर पूर परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, यामधून महापालिकेने कोणताही धडा घेतला नसल्याचे दिसत आहे. याही वर्षी या ठिकाणी पूरस्थितीचा धोका निर्माण झालेला पहायला मिळत आहे.**



हिंजवडीत राजीव गांधी आयटी पार्क आल्यानंतर पिंपळे सौदागर परिसराचा झपाट्याने विकास सुरू झाला. विविध गृहनिर्माण सोसायट्या उभ्या राहिल्या. केंद्र सरकारच्या स्मार्ट सिटी योजनेत या भागाचा समावेश झाला. नाशिक फाटा उड्डाणपुलामुळे हा परिसर मुंबई-पुणे आणि पुणे-नाशिक महामार्गाला जोडला गेला. सांगवी-किवळे आणि नाशिक फाटा-वाड या बीआरटी मार्गामुळे कनेक्टिव्हिटी वाढली. आयटीयन्सकडून चांगला प्रतिसाद मिळत गेला. झपाट्याने परिसराचा विकास होत गेला. जमिनीला सोन्याचे भाव आले. त्यानंतर सुरू झालेला विकास आजपर्यंत थांबलेला नाही. प्रशस्त रस्ते, टोलेजंग इमारती, व्यावसायिक संकुले, मॉल, चित्रपटगृह, हॉटेल नावारूपास आली आहेत. त्यामध्ये जमीन मालक, बांधकाम व्यावसायिक गडगंज झाले. मात्र, परिसराचा विकास होत असताना निसर्ग नियमांकडे दुर्लक्ष करत नैसर्गिक नालेच गायब झाले आहेत.

### गायब झालेले नाले

» पी. के. चौकाजवळील बीआरटी मार्गाच्या पलीकडून लिनियर गार्डन व शिवम सोसायटीच्या खालून पुढे मोकळ्या जागेतून जाणारा रहाटणी गाव नाला पूर्णपणे पाइप टाकून बंद केला आहे. पवना नदी पात्रातही कॉंक्रीटीकरण केले आहे, महापालिका आरोग्य विभागाकडे मात्र, शिवम सोसायटी ते फायबर स्वच्छतागृह अशी या नाल्याची नोंद आहे.

» काटे वस्तीतून वाहणाऱ्या नाल्याला संरक्षण खात्याच्या परिसरातून आलेले पावसाचे पाणी मिळते. मात्र, तो नालाही कुंजीर कॉलनीत लुप्त झाला आहे. महापालिकेच्या नोंदीनुसार, भानुदास काटे यांच्या घराजवळून वाहणारा नाला अगदी दहा-पंधरा मीटर सोडल्यास नदीपर्यंत बंदीस्त आहे.

» घरोंदा सोसायटीजवळील मोकळ्या जागेतील नाला पाइप टाकून बंद केला आहे. पाइपमधून हे पाणी कुठे जाते? हे कोणालाच माहीत नाही. कारण तेथून पुढे पाचशे मीटर अंतरावर असलेल्या निसर्ग निर्माण सोसायटीपर्यंतच हा नाला असल्याची पालिकेत नोंद आहे.

### असे नाले, अशी ठिकाणे

**नाले / लांबी (मीटर) / रुंदी (मीटर)**

**शिवम सोसायटी ते फायबर स्वच्छतागृह (रहाटणी गाव नाला) / १५२ / ५**

**कुंजीर निवास ते निकम यांच्या घरापर्यंत / ३९६ / ०.९१**

**भानुदास काटे निवास ते पवना नदीपर्यंत / १३३ / ५**

**घरोंदा सोसायटी ते निसर्ग निर्माण सोसायटी / ५१० / ३.६५**

### पावसाळी पाण्याचे मार्ग बंद

» पिंपळे सौदागर परिसरात चार नाले शिल्लक असल्याची नोंद महापालिकेकडे आहे. मात्र, ती नोंदही अंदाजे घेतली असल्याचे संबंधित कर्मचारी खासगीत सांगतात. कारण, पूर्वीचे अनेक ओढे, नाले कायमचे बुजविण्यात आले असून शिल्लक असलेले बंदिस्त करण्यात आले आहेत. त्यामुळे पावसाचे पाणी नदीपर्यंत जाणे कठीण झाले आहे.

### अशी उद्भवली परिस्थिती...

- » **दोन वर्षांपूर्वी पी. के. चौक ते कोकणे चौकादरम्यान पावसाचे पाणी साचून पूरपरिस्थिती निर्माण झाली होती**
- » **नाले बंदीस्त केल्याने पावसाळी जलवाहिनीतून (स्ट्रॉम वॉटर लाईन) पाणी जाणे अशक्य**
- » **मुसळधार व संततधार पावसात पुर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता**
- » **उच्चभ्रू परिसरात पावसाच्या पाण्याच्या नियोजनाचा अभाव**

---

# उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड ही 'क्रीडानगरी' होईल!

## » शंकर जगताप यांचा विश्वास: शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते सागर कांबळे यांचा सन्मान

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड मधील अनेक खेळाडूनी आतापर्यंत क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी बजावली आहे. शहरामध्ये अनेक शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू आहेत. त्या खेळाडूंनी आपल्या मेहनतीच्या जोरावर आपल्या शहराची ओळख सातासमुद्रापार घेवून गेले आहेत. त्यामुळे उद्योगनगरी असणारे आपले शहर भविष्यात खेळाडुंसाठी अद्यायावत 'क्रीडानगरी' होईल, असा विश्वास भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी व्यक्त केला.**

### » आगामी "सेव्हन ओशन" समिटसाठी शहरवासीयांच्या वतीने दिल्या शुभेच्छा



'सेव्हन ओशन' पैकी चार 'ओशन' जलतरणद्वारे पार करणाऱ्या सागर किशोर कांबळे याला राज्य सरकारतर्फे 'शिवछत्रपती पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले. यावेळी शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी सागर कांबळे यांची भेट घेतली. तसेच, त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा नियोहन समितीचे सदस्य काळूराम नढे, आमदार लक्ष्मणभाऊ जगताप कला क्रीडा अकादमीचे अध्यक्ष माऊली जगताप तसेच कांबळे यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते.

सागर कांबळे यांने जलतरण करताना जगतातील 'सेव्हन ओशन' पार करण्याचे ध्येय ठेवले आहे. बंगालची खाडी, इंग्लिश खाडी, कॅटरिना खाडी, दक्षिण आफ्रिकेतील खाडी अशा चार खाड्या पार केल्या असून आगामी काळात सागरच्या वतीने तीन खाड्या पार करण्यात येणार आहेत. या खड्या पार करण्यासाठी शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

> "अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करत सागरने यशाला गवसणी घातली. हिंमत आणि कष्टाच्या जोरावर कोणतेही यश मिळवता येते याचीच प्रचिती यातून झाली. त्याचे यश सर्व युवकांना प्रेरणा देणारे आहे. शहरातून अनेक खेळाडू राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर शहराचे नाव लौकिक करत आहेत. औद्योगिक आणि आयटी हब अशी ओळख असणारी आपली नगरी आता शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातदेखील अग्रेसर होत आहे. शहरातील खेळाडूंनी आपापल्या आवडत्या खेळात सहभाग घेऊन उत्तुंग यश मिळवावे. आगामी काळात पिंपरी-चिंचवड शहर हे एक शिक्षण आणि क्रीडानगरी म्हणून ओळखली जाईल असा मला विश्वास आहे.
> - शंकर जगताप, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड




# विजयी होणे महाविकास आघाडीसाठी अशक्य!

**भारताच्या निवडणूक इतिहासातील २०२४ ची लोकसभा निवडणूक अगदी वेगळी असणार आहे, अगदी घनघोर राजकीय युद्धच असेल. त्यामुळे ही निवडणूक जिंकण्यासाठी भाजप आघाडी आणि काँग्रेस आघाडीच्या दृष्टीनेही उत्तर प्रदेश खालोखाल महाराष्ट्र महत्त्वाचे ठरणार आहे.**

देशात राजकीय परिवर्तन घडवून आणायचे असेल तर विरोधकांना, विशेतः काँग्रेसला महाराष्ट्र सर करावा लागेल. मात्र त्यासाठी केवळ राजकीय आघाडी करून चालणार नाही. राज्यात निवडणुकीवर प्रभाव टाकणारे विविध सामाजिक घटक आहेत, त्या राजकीय शक्ती आहेत. ज्यांच्या बाजूने त्या जातील त्यांचा विजय निश्चित आहे, असे आजवरचे निवडणूक निकाल सांगतात. अशांपैकी महाराष्ट्रात आंबेडकरी राजकीय शक्तीचा निवडणुकीवर कायम प्रभाव राहिला आहे, म्हणून आगामी लोकसभा निवडणुकीतही तिची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. महाराष्ट्रातील आंबेडकरी राजकीय शक्ती ही धर्माधिष्ठित राजकारणाला उघड व घटनात्मक भूमिकेतून विरोध करणारी आहे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसला आणि भाजप-शिवसेनेलाही आंबेडकरी चळवळीची ताकद माहीत आहे. किमान महाराष्ट्रात तरी काँग्रेससमोर विरोधी पक्षांनी जेव्हा जेव्हा आव्हाने उभी केली,



त्या त्या वेळी आंबेडकरी राजकीय शक्तीने त्यांना सावरले आणि सत्तास्थानी राहण्याची संधी त्यांना मिळाली. महाराष्ट्रात १९८७-८८ दरम्यान 'रिडल्स'चा वाद पेटला, त्यावेळी वैचारिक पातळीवर आणि रस्त्यावरच्या शक्तिप्रदर्शनातही आघाडी घेऊन आंबेडकरी चळवळीने 'रिडल्स'ची लढाई जिंकली आणि त्यानंतरच भाजप-शिवसेना युती कट्टर हिंदुत्वाकडे वळल्याचे दिसते. त्यांनी निवडणूक प्रचारात कडवट हिंदुत्व आणले. भाजप- शिवसेनेच्या कडव्या हिंदुत्ववादाने काँग्रेससमोर राजकीय आव्हान उभे केले होते. त्याची जाणीव तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांना झाली. त्यामुळेच त्यावेळी त्यांनी शिवसेना व भाजपच्या कट्टर हिंदुत्वाच्या विरोधात आक्रमक भूमिक घेत एकवटलेल्या रिपब्लिकन पक्षाला जवळ करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी औट घटकेतच रिपब्लिकन ऐक्य दुभंगले, तरी रामदास आठवले यांचा गट काँग्रेसबरोबर गेला, त्याचबरोबर आंबेडकरी अनुयायांमध्ये शिवसेना- भाजपच्या विरोधात जो रोष होता, तो मतपेटीत उतरला. त्यामुळे त्यावेळी, म्हणजे १९९० च्या विधानसभा निवडणुकीत मोठी ताकद लावूनही शिवसेना-भाजपला सत्ता मिळू शकली नाही आणि काँग्रेसच्या हातातून सत्ता जाता जाता राहिली. त्यानंतर १९९२ मध्ये बाबरी मशीद पाडल्यानंतर देशातील राजकीय-सामाजिक वातावरण बदलून गेले. कधी नव्हे इतका धर्मिक कडवटपणा लोकांच्या मनात निर्माण झाला. त्या वातावरणात १९९५ ची विधानसभेची निवडणूक झाली, त्यावेळी राज्यात सत्तांतर झाले. शिवसेना-भाजप सत्तेवर आले. परंतु त्यालाही काँग्रेसमधील बंडाळी कारणीभूत ठरली होती. काँग्रेसमधील जे ४० हून अधिक अपक्ष-बंडखोर म्हणून निवडून आले होते, त्यांच्याच आधाराने युतीचे सरकार स्थापन झाले. काँग्रेसमध्ये बंडखोरी झाली नसती, तर त्यावेळीही शिवसेना-भाजपला सत्ता मिळाली नसती. पुढे १९९९ मध्ये तर काँग्रेसमध्येच फूट पडली. शरद पवार काँग्रेसमधून बाहेर पडले व त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस हा नवा पक्ष स्थापन केला. त्यावेळी झालेल्या लोकसभा निवडणुकीत प्रकाश आंबेडकर यांनी काँग्रेसला हात दिला आणि रामदास आठवले यांनी राष्ट्रवादीला साथ दिली, त्यामुळे त्याचा फायदा काँग्रेस व राष्ट्रवादीला झाला. आंबेडकर व आठवले दोघेही लोकसभेवर निवडून गेले.

विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी शिवसेना-भाजपचा पराभव झाला आणि पुन्हा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी आघाडीची सत्ता आली. १९९० नंतर भाजपने देशभर हिंदुत्वाच्या नावाने धार्मिक राजकारणाचा ज्वर पसरवला, त्यासाठी महाराष्ट्रात त्यांनी शिवसेनेला हाताशी धरले. अर्थात बाळासाहेब ठाकरे यांनीही त्यांना तितक्याच कडवटपणे साथ दिली. धार्मिक विभाजन करून मतांचे ध्रुवीकरण करण्याचा भाजप-शिवसेनेने प्रयत्न केला, त्यामुळे काँग्रेसचा जनाधार कमी होत गेला. अशा वेळी महाराष्ट्रात काँग्रेसला सावरण्यात आंबेडकरी राजकीय शक्तीचा हातभार लागला.

## संपादकीय »

# अस्वलाच्या गुदगुल्या!

***सर्वच पक्षांनी मुंबईस लुटण्याखेरीज काहीही केले नाही हे मान्य. परंतु म्हणून मुंबईच्या विकासाचे सूत्रसंचालन केंद्राने करावे; हा पर्याय असूच शकत नाही..***

मुंबईच्या विकासात लक्ष घालण्याची केंद्राची इच्छा वरकरणी तशी स्वागतार्हच. पण फक्त वरकरणीच. याचे कारण केंद्राच्या या उद्दिष्टामागील विचार कल्याणकारीच आहे, असे ठामपणे सांगावे असा विद्यमान सरकारचा लौकिक नाही. हे आपले विकासात्मक धोरण सर्वसमावेशक आहे असे भासावे म्हणून मुंबईच्या बरोबर बनारस, विशाखापट्टणम, सुरत या तीन शहरांचीही निवड याकामी करण्यात आली आहे. म्हणजे या शहरांच्या विकासाचा विडा केंद्र उचलणार. पण या विकासमोहिमेतील निवडीइतकीच न निवडलेली शहरेदेखील तशी जास्त महत्त्वाची. वास्तविक गुजरातेतील फक्त शहरेच काय; संपूर्ण समस्त गुजरातच्या विकासाची जबाबदारी केंद्राने उचललेली आहे. परंतु सुरत शहर निवडले जाते, याचा एक अर्थ केंद्र सरकार त्या शहराच्या विकासासाठी अधिक काही देऊ इच्छिते, असा. यातील कोणतेही कारण असो.

**अक्साई चीन हा भारताचा भूभाग १९६२ मधील युद्धानंतर चीनने व्यापला. अरुणाचल प्रदेशाला चीन दक्षिण तिबेट असे संबोधतो. या वर्षी एप्रिल महिन्यात अरुणाचलमधील ११ स्थळांचे एकतर्फी चिनी नामकरण त्या देशाने केले होते. आता चीनने नुकत्याच जारी केलेल्या त्यांच्या 'अधिकृत' नकाशामध्ये अक्साई चीन आणि अरुणाचल हे चीनचे प्रदेश म्हणून दाखवण्यात आले आहेत.**

# अजूनही गप्पच राहणार ?

चीनतर्फे जारी 'अधिकृत नकाशा'मध्ये तैवान आणि दक्षिण चीन समुद्राच्या काही भागावरही चीनचे स्वामित्व दाखवल्याचे आढळून आले. त्याबद्दल तैवान, व्हिएतनाम, मलेशिया, फिलिपिन्स, ब्रुनेई आदी देशांनी आक्षेप नोंदवलेला आहे. तसा तो भारतानेही यथास्थित नोंदवला. चीनने बुधवारीच याविषयी निवेदन जारी करून, नकाशे प्रसृत करणे हा नित्याचाच भाग असल्याचे आणि त्यावरून उठलेला वाद अनाठायी असल्याचे म्हटले आहे. चीनचा हा 'नवनित्य' पवित्रा तीन वर्षांपूर्वीच्या गलवान चकमकीनंतर अधिक उग्र बनला आहे. त्यावर फुटकळ उपयोजनांवर बंदी आणण्यापलीकडे प्रतिसाद म्हणून आपण काही ठोस करू शकलेलो नाही हे वास्तव स्वीकारावे लागते. चीनच्या ताज्या पवित्र्याबाबत कुतूहलाचा भाग म्हणजे, काही दिवसांपूर्वीच 'ब्रिक्स' बैठकीच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यात प्रत्यक्ष ताबारेषेवरून सैन्यमाघारीचे प्रयत्न



करण्याविषयी मतैक्य झाल्याचे भारताने म्हटले होते. येत्या दहा दिवसांत हे दोन नेते नवी दिल्लीत जी-२० समूहाच्या शिखर परिषदेच्या निमित्ताने पुन्हा भेटणार आहेत. ब्रिक्समधील वरकरणी काही क्षणांच्या भासलेल्या भेटीदरम्यान नेमके काय घडले याविषयी प्रसृत भारतीय आणि चिनी निवेदनांमध्ये तफावत आढळली. तरीही चीनच्या वागण्यात फरक पडलेला नाही. यानिमित्ताने काही ठळक निरीक्षणे मांडावी लागतील. प्रत्यक्ष ताबारेषेदरम्यान अनेक निर्लष्करी टापूंमध्ये आणि गस्तीबिंदूंवर चिनी लष्कराने घुसखोरी केल्यामुळे विद्यमान संघर्ष सुरू झाला. या संघर्षांपूर्वीची म्हणजे गलवान २०२० पूर्व स्थिती (स्टेटस को आन्ते) जोपर्यंत बहाल होत नाही, तोवर वाटाघाटी सुफळ संपूर्ण झाल्या असे मानायचे नाही ही भारताची भूमिका. ताबारेषेवरील विविध टापूंबाबत वाटाघाटी सुरू आहेत. यातील काही सैन्यमाघारीविषयी मतैक्य झाल्यामुळे संपल्या, काही अजून अनिर्णित आहेत. निर्लष्करी भागावर आमचाच हक्क असा हट्टाग्रह चीनने धरला असून, भारताच्या काही गस्तीबिदूंवरील ताबाही सोडलेला नाही. याशिवाय सीमावर्ती भागामध्ये मोठ्या प्रमाणात सैन्य आणि सामग्रीची जमवाजमव, या भागांमध्ये गावे व नागरी वस्त्या वसवणे, पायाभूत सुविधांचे जाळे उभारणे असले उद्योग चीनने कितीतरी आधी सुरू केले होते. भारतानेही सैन्य, सामग्री तैनाती आणि पायाभूत सुविधा उभारणी युद्धपातळीवर हाती घेतली. लष्करी कमांडर आणि राजनैतिक पातळीवर चर्चा होतात, संपतात किंवा फसतात. पण अंतिम निर्णय घेण्याची जबाबदारी आणि इच्छाशक्ती शीर्षस्थ नेत्यांच्या पातळीवरूनच दिसली पाहिजे. तिच्या अनुपस्थितीत चर्चा आणि वाटाघाटींचे गुऱ्हाळ निरंतर सुरू राहील.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पैसे नसतील तर सांग गणपतीपुढे दानपेटी ठेवतो अन् तुला देतो : बच्चू कडू

## 'ऑनलाईन गेमिंग'वरून तेंडुलकरविरोधात आक्रमक

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू यांनी सचिन तेंडूलकरला 15 दिवसांचा अल्टिमेटम दिला होता. तरी देखील सचिन तेंडुलकरकडून प्रतिसाद मिळाला नसल्याने बच्चू कडू यांनी मुंबईतील सचिनच्या घराबाहेर आंदोलन केले. या वेळी आमदार बच्चू कडू यांच्यासह त्यांच्या समर्थकांना पोलिसांनी ताब्यात घेतले. भारततत्न असलेल्या व्यक्तीने ऑनलाइन गेमची जाहिरात करुन तरुणांमध्ये चुकिचा संदेश देऊ नये, अशी मागणी आमदार बच्चू कडू यांनी केली आहे.**




या आंदोलनानंतर बच्चू कडू यांनी आता नवीन घोषणा केली आहे. ते म्हणाले की, आमचा विरोध तेंडुलकर यांना नाही. परंतु भारतरत्न व्यक्तीस ही बाब अशोभनीय आहे. एकतर त्यांनी जाहीरात बंद करावी नाहीतर भारतरत्न परत करावा.

अन्यथा संपुर्ण महाराष्ट्रातील बस स्टॉप व गणेश मंडळाजवळ तेंडुलकर भिकपेटी व तेंडुलकर सुचना पेटी लावण्यात येईल. या संदर्भात सचिनने ऑनलाइन जाहिरातीतून माघार घ्यावी, नाहीत त्याच्या घरासमोर आंदोलन करु, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला होता.

त्यामुळे सचिन तेंडूलकरच्या विराधोत आंदोलन तीव्र होण्याची शक्यता आधीच वर्तवली जात होती. त्यानुसार आजचे आंदोलन झाले. आंदोलनकर्ते अधिक आक्रमक झाल्याचे दिसून आले. सचिन तेंडुलकरने आपल्या वडिलांना वचन दिल्यामुळे आपण आजपर्यंत पानमसाला, गुटखा, तंबाकू यांच्या जाहिराती केल्या नसल्याचे जाहीरपणे म्हटले आहे. मात्र, तरीही त्याने केलेल्या एका जाहिरातीवरून बच्चू कडू संतप्त झाले आहेत. त्याने ऑनलाईन गेमची जाहिरात केली आहे. या जाहिरातीलाच आमदार बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेचा विरोध आहे.

या संदर्भात आमदार बच्चू कडू म्हणाले होते की, भारतरत्न असलेले सचिन तेंडुलकर यांनी यावर स्पष्टीकरण दिले पाहीजे. या भारताचा ते अभिमान आहेत. ऑनलाइन गेमच्या जाहिरातीतून त्यांनी माघार घ्यावी. या गेममधून सर्वांची मुक्तता व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. या गेममुळे पालकांमध्ये प्रचंड रोष आहे. एकिकडे गेममध्ये पैसे गुंतवू नका अशी जाहिरात करायची आणि तेच दुसरीकडे गेमची जाहिरात करायची, असा दुहेरी धंदा सुरू असल्याचा आरोप आमदार बच्चू कडू यांनी केला होता.

आमदार बच्चू कडू यांनी यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत पत्र पाठवले होते. मात्र कोणतीही कारवाई झाली नाही. या जुगाराच्या जाहिरातीला महाराष्ट्रातील जनता बळी पडत असून त्यांचे कौटुंबिक आयुष्य उद्ध्वस्त देखील होत आहे. अशा प्रकारच्या तक्रारी बऱ्याच जणांकडून माझ्यापर्यंत प्राप्त झाल्या असल्याचे बच्चू कडू यांनी म्हटले होते.

### काय म्हणाले होते बच्चू कडू

» या संदर्भात आमदार बच्चू कडू म्हणाले होते की, भारतरत्न असलेले सचिन तेंडुलकर यांनी यावर स्पष्टीकरण दिले पाहीजे. या भारताचा ते अभिमान आहेत. ऑनलाइन गेमच्या जाहिरातीतून त्यांनी माघार घ्यावी. या गेममधून सर्वांची मुक्तता व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. या गेममुळे पालकांमध्ये प्रचंड रोष आहे. एकिकडे गेममध्ये पैसे गुंतवू नका अशी जाहिरात करायची आणि तेच दुसरीकडे गेमची जाहिरात करायची, असा दुहेरी धंदा सुरू असल्याचा आरोप आमदार बच्चू कडू यांनी केला होता.

---

# 'उद्धव' टोमणेबाज म्हणून नावारूपाला आले !

## बाळासाहेब ठाकरे हिंदू शेर म्हणून लोकप्रिय होते: भाजप

।मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विरोधकांच्या मुंबईतील इंडिया आघाडीच्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी भाजपने शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर तुफान हल्लाबोल केला आहे. बाळासाहेब हिंदू शेर म्हणून लोकप्रिय होते.**

याऊलट उद्धव ठाकरे टोमणेबाज म्हणून नावारुपाला आलेत, असे ते म्हणालेत. भाजपा महाराष्ट्रने आपल्या ट्विटर अकाउंटवर म्हटले आहे की, स्वर्गीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जोपर्यंत हयात होते, तोपर्यंत पाकिस्तान धार्जिणे, देशविरोधी तत्वांची मुंबईत येण्याची हिंमत होत नसायची. पण आता दुर्दैवाने बाळासाहेब आपल्यात नाहीत, तर मुंबईत सत्तेच्या हव्यासाने पाकिस्तान धार्जिणे, देशविरोधी तत्व मुंबईकडे निघाली. बाळासाहेबांचा वारस असलेल्या उद्धव ठाकरेंना असा



काही सत्तामोह झालाय की, बाळासाहेब ज्या देशविघातक तत्वांविरोधात आयुष्यभर लढले. त्यांच्यासाठी त्यांचाच पुत्र उद्धव पायघड्या अंथरत आहे. बाळासाहेब हिंदू शेर म्हणून देशभर लोकप्रिय होते तर, "उद्धव" टोमणेबाज म्हणून नावारूपाला आलेत, असे भाजपने म्हटले आहे. भाजपने आपला हल्ला अधिक धारदार करताना पुढे म्हटले आहे की, अखंड भारताला कलंक असलेल्या आर्टिकल 370 चे समर्थन करणारे फारूक अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती उद्धव ठाकरेंसाठी विशेष अतिथी झालेत. ज्या ज्या नेत्यांना पाकिस्तानबद्दल विशेष प्रेम आहे.

### विनाश काले विपरीत बुद्धि

» मराठी जनतेने बाळासाहेबांनी मुंबईतून देशबंदची हाक देऊन, संपूर्ण देश बंद होताना पाहिलाय. अगदी पाकिस्तानचा विरोध करायला खेळपट्ट्या उखडणारे शिवसैनिक पाहिलेत. आता मराठी जनता "देशविरोधी लोकांची" हुजरेगिरी करणारे, "सोनिया" गांधीसमोर वाकणारे उद्धव ठाकरे पाहत आहेत, हेच काय दुर्दैव, असेही भाजपने आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

# सुप्रीम कोर्टाच्या नावे फेक वेबसाइट!

## » फसवणुकीचे बळी असाल तर लगेच सर्व पासवर्ड बदला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकृत वेबसाइटच्या नावाखाली लोकांची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला जात आहे. न्यायालयाने एक परिपत्रक जारी करून म्हटले आहे की, त्यांच्या अधिकृत वेबसाइटसारखीच बनावट वेबसाइट तयार करण्यात आली आहे. याद्वारे हॅकर्स लोकांची वैयक्तिक आणि गोपनीय माहिती गोळा करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीने लोकांना सतर्क राहण्यास सांगितले आहे.**

या बनावट वेबसाइट्स URL HTTP://CBINS/SCIGV.COM आणि HTTPS://CBINS.SCIGV.COM/OFFENSE वर होस्ट केल्या जात असल्याची माहिती नोंदणीने दिली. यातील दुसऱ्या URL वर क्लिक केल्यावर एक वेबसाइट उघडते ज्याच्या शीर्षलेखात लिहिले आहे - मनी लाँडरिंगचा गुन्हा. या वेबसाइटवर लोकांची वैयक्तिक माहिती, इंटरनेट-बँकिंग, क्रेडिट आणि डेबिट कार्डशी संबंधित माहिती चोरली जात आहे.

न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, अधिकृत वेबसाइटप्रमाणे दिसणाऱ्या या साइटवर माहिती भरण्यासाठी अनेक बॉक्स आहेत, ज्यात बँकेचे नाव, फोन नंबर, परमनंट अकाउंट नंबर (पॅन), ऑनलाइन बँकिंग यूजर आयडी, लॉग-इन पासवर्ड आणि कार्ड पासवर्ड यांचा समावेश आहे. या संकेतस्थळांना



भेट देणाऱ्या वापरकर्त्यांना त्यांची वैयक्तिक आणि गोपनीय माहिती शेअर करू नये, अशा कडक सूचना आमच्याकडे असल्याचं कोर्टाने आपल्या ॲडव्हायझरीत म्हटलं आहे. ही माहिती गुन्हेगार चोरू शकतात. नेहमी लक्षात ठेवा की सर्वोच्च न्यायालयाची रजिस्ट्री कधीही तुमच्याकडून वैयक्तिक, आर्थिक किंवा इतर कोणतीही गोपनीय माहिती मागणार नाही.

रजिस्ट्रीने म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाने कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या एजन्सींना या बनावट वेबसाइट्सची माहिती दिली आहे, जेणेकरून आरोपींना ओळखता येईल आणि कारवाई करता येईल. रजिस्ट्रीने लोकांना सल्ला दिला आहे की, कोणत्याही URL वर क्लिक करण्यापूर्वी त्याची नीट पडताळणी करा. जर तुम्ही फसवणुकीला बळी पडला असाल तर तुमच्या सर्व ऑनलाइन खात्यांचे पासवर्ड ताबडतोब बदला आणि तुमच्या बँक आणि क्रेडिट कार्ड कंपनीला याची माहिती द्या, असे रजिस्ट्रीने म्हटले आहे.

### आम्ही वैयक्तिक माहिती विचारणार नाही

» न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, अधिकृत वेबसाइटप्रमाणे दिसणाऱ्या या साइटवर माहिती भरण्यासाठी अनेक बॉक्स आहेत, ज्यात बँकेचे नाव, फोन नंबर, परमनंट अकाउंट नंबर (पॅन), ऑनलाइन बँकिंग यूजर आयडी, लॉग-इन पासवर्ड आणि कार्ड पासवर्ड यांचा समावेश आहे. या संकेतस्थळांना भेट देणाऱ्या वापरकर्त्यांना त्यांची वैयक्तिक आणि गोपनीय माहिती शेअर करू नये, अशा कडक सूचना आमच्याकडे असल्याचं कोर्टाने आपल्या ॲडव्हायझरीत म्हटलं आहे. ही माहिती गुन्हेगार चोरू शकतात. नेहमी लक्षात ठेवा की सर्वोच्च न्यायालयाची रजिस्ट्री कधीही तुमच्याकडून वैयक्तिक, आर्थिक किंवा इतर कोणतीही गोपनीय माहिती मागणार नाही.

# नाव बदलल्याने वास्तव बदलणार नाही!

## » अरुणाचल, अक्साई चीन आमचा भाग : भारतीय मंत्रालय

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अरुणाचल प्रदेश आणि अक्साई चीन आपल्या नकाशात दाखविणारा चीन आता आपल्या कृतीला योग्य ठरवत आहे. त्यांनी याला सामान्य गोष्ट म्हटले आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने बुधवारी, 30 ऑगस्ट रोजी सांगितले की चीनच्या नकाशाची 2023 आवृत्ती जारी करणे ही एक सामान्य प्रक्रिया आहे. चीनचे सार्वभौमत्व आणि अखंडता लक्षात घेऊन हा नकाशा जारी करण्यात आला आहे. हा भाग कायदेशीररित्या आमचा आहे. त्यांचे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते वांग वेनबिन म्हणाले की, आम्हाला आशा आहे की संबंधित पक्ष (भारत) या विषयावर शांत राहतील आणि त्यावर जास्त बोलणे टाळतील.**

चीनने आपला अधिकृत नकाशा २८ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केला. यामध्ये भारताचा अरुणाचल प्रदेश, अक्साई चीन, तैवान आणि वादग्रस्त दक्षिण चीन समुद्र हा आपला प्रदेश म्हणून दाखवण्यात आला होता. चीनच्या सरकारी वृत्तपत्राने दुपारी 3:47 वाजता X ॲपवर नवीन नकाशा पोस्ट केला. यावर भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी म्हटले होते की, ही चीनची जुनी सवय आहे. त्यांच्या दाव्याला काही अर्थ नाही. अलीकडेच एनडीटीव्हीला दिलेल्या मुलाखतीत परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी भारतीय भूभागावर दावा सांगण्याचा चीनचा दावा पूर्णपणे फेटाळून लावला होता. परराष्ट्र मंत्री जयशंकर म्हणाले होते - चीनने नकाशात जे क्षेत्र स्वतःचे असल्याचे घोषित केले आहे, ते त्यांचे नाहीत. हे करण्याची चीनची जुनी सवय आहे. ते म्हणाले- अक्साई चीन आणि लडाख हे भारताचे अविभाज्य भाग आहेत. यापूर्वीही चीन भारताच्या काही भागांचे नकाशे बनवत आहे. त्याच्या दाव्याला काहीही अर्थ नाही.



आमच्या सरकारची भूमिका स्पष्ट आहे. निरुपयोगी दावे करण्याचा अर्थ असा नाही की दुसऱ्याचे क्षेत्र तुमचे होईल. काँग्रेसचे खासदार मनीष तिवारी यांनीही चीनचा दावा बेतुका असल्याचे म्हटले होते. तिवारी म्हणाले होते- चिनी नकाशे हे प्रमाणित नकाशे नाहीत. हे चीन-भारत सीमा विवादाच्या इतिहासाशी जुळत नाही. अशा स्थितीत चीनचा दावा मूर्खपणाचा आहे. आज खरा मुद्दा असा आहे की चीनने थिएटर स्तरावर अनेक ठिकाणी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेचे उल्लंघन केले आहे. तिवारी म्हणाले होते- चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग सप्टेंबरमध्ये होणाऱ्या G20 बैठकीत येत आहेत. अशा परिस्थितीत जिनपिंग यांचे यजमानपद भारताच्या स्वाभिमानाशी सुसंगत असेल का, याचा सरकारने गांभीर्याने आत्मपरीक्षण करायला हवा. चीनने एलएसीजवळील 2000 चौरस किलोमीटरचा भारतीय भूभाग बेकायदेशीरपणे ताब्यात घेतला आहे, तो रिकामा करणे आवश्यक आहे. थोडक्यात, चिनी नकाशे हास्यास्पद आहेत, ते चीनच्या इतिहासाशी सुसंगत नाहीत. यापूर्वी, एप्रिल 2023 मध्ये चीनने आपल्या नकाशात अरुणाचल प्रदेशातील 11 ठिकाणांची नावे बदलली होती. चीनने गेल्या पाच वर्षांत तिसऱ्यांदा अशी कामगिरी केली आहे. याआधी चीनने 2021 मध्ये 15 आणि 2017 मध्ये 6 ठिकाणांची नावे बदलली होती. चीनच्या या कृतीला भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने प्रत्युत्तर दिले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची म्हणाले होते - चीनच्या अशा कारवायांचे वृत्त आम्हाला यापूर्वीही आले आहे. आम्ही ही नवीन नावे नाकारतो. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अंतर्गत भाग होता, आहे आणि राहील. अशा प्रकारे नाव बदलून वास्तव बदलणार नाही. चीनच्या या कृतीला भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने प्रत्युत्तर दिले. परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते अरिंदम बागची म्हणाले होते - चीनच्या अशा कारवायांचे वृत्त आम्हाला यापूर्वीही आले आहे. आम्ही ही नवीन नावे नाकारतो. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अंतर्गत भाग होता, आहे आणि राहील. अशा प्रकारे नाव बदलून वास्तव बदलणार नाही.

### बदलण्यामागे चीनचा काय दावा आहे?

» 2021 मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशातील 15 ठिकाणांची नावे बदलली. यापैकी 8 निवासी क्षेत्रे, 4 पर्वत, 2 नद्या आणि एक डोंगरातून बाहेर पडण्याचा मार्ग होता. चीनने अरुणाचल प्रदेशाची नावे का बदलली याचा अंदाज तेथील एका संशोधकाच्या विधानावरून लावता येतो. 2015 मध्ये, चायनीज ॲकॅडमी ऑफ सोशल सायन्सेसचे संशोधक झांग योंगपॅन यांनी ग्लोबल टाईम्सला सांगितले की, "ज्या ठिकाणांची नावे बदलली आहेत ती जवळपास शंभर वर्षांपासून आहेत." चीनने या ठिकाणांची नावे बदलणे पूर्णपणे न्याय्य आहे. पूर्वीच्या काळी झेंग्नान (चीनमध्ये अरुणाचलला दिलेले नाव) भागांची नावे केंद्र किंवा स्थानिक सरकारे देत असत. याशिवाय तिबेटी, लाहोबा, मोंबा यांसारख्या परिसरातील वांशिक समुदायही त्यानुसार ठिकाणांची नावे बदलत असत.

## शाहरुखचे जंगी स्वागत



बुधवारी चेन्नईमध्ये जवानचा भव्य म्युझिक लाँच कार्यक्रम पार पडला. शाहरुख खान, विजय सेतुपती, संगीतकार अनिरुद्ध आणि दिग्दर्शक ॲटली कुमार यांच्यासह चित्रपटाशी संबंधित अनेक जण तेथे पोहोचले. या कार्यक्रमात शाहरुख खानचे भव्य स्वागत करण्यात आले. हा कार्यक्रम स्थानिक महाविद्यालयात ठेवण्यात आला होता. हजारो चाहते तेथे पोहोचले होते. हा कार्यक्रम 7 सप्टेंबरला चित्रपट प्रदर्शित होण्याच्या एक आठवड्यापूर्वी आयोजित करण्यात आला होता. हिंदुस्तान टाइम्सच्या रिपोर्टनुसार, म्युझिक लॉन्च इव्हेंटमध्ये चित्रपटाचे दिग्दर्शक ॲटली म्हणाले की, एकेकाळी ते मुंबईत शाहरुखच्या मन्नत या घराबाहेर शूटिंग करत होते. हा प्रकार त्याच्या मित्राला कळताच त्याने मन्नतसमोर उभे राहून फोटो काढण्यास सांगितले. ॲटली सांगतात की, या घटनेच्या 13 वर्षांनंतर स्वतः शाहरुख खानने त्यांच्यासाठी मन्नतचे गेट उघडले आहे. 'जवान'मध्ये खलनायकाची भूमिका करणारा अभिनेता विजय सेतुपतीही या कार्यक्रमाला उपस्थित होता. तो म्हणाला- कॉलेजमध्ये माझे एका मुलीवर प्रेम होते. तिला शाहरुख खान खूप आवडायचा. आता शाहरुखकडून याचा बदला घेण्याची संधी मला मिळाली आहे. शाहरुखने विनोदाने उत्तर दिले - तू माझ्याकडून बदला घेशील, पण तू माझ्याकडून मुली हिसकावून घेऊ शकत नाहीस. चित्रपटाचे कला दिग्दर्शक मुथुराज म्हणाले- शाहरुख खानने जवानाच्या माध्यमातून 3000 कुटुंबांना रोजगार दिला आहे. त्यांना हवे असते तर त्यांना मुंबईत सहज सेट करता आले असते. ते चेन्नईला आले. त्या सर्व कुटुंबीयांच्या वतीने मला शाहरुखचे आभार मानायचे आहेत. शाहरुख खान आज (31 ऑगस्ट) बुर्ज खलिफा येथे चित्रपटाचा ट्रेलर लाँच करणार आहे. याबाबतची माहिती शाहरुखने सोशल मीडियावर आधीच दिली होती.

# राधिका पहिल्यांदाच नेपोटिझमवर बोलली!



अभिनेत्री राधिका आपटे हिची वेगळी ओळख सांगायची गरज नाही. तिने तिच्या अभिनय कौशल्यानं मनोरंजन विश्वात वेगळीच ओळख निर्माण केली आहे. राधिका आपटे कायमच चर्चेत असते. राधिका ही नेहमी नवनवीन भूमिका, धाडसी प्रयोग आणि तिच्या बोल्ड अभिनयासाठी ओळखली जाते. अभिनेत्री राधिका आपटेचे अनेकदा तिच्या निःपक्षपाती मतांसाठी कौतुक केले जाते. कामांबरोबरच ती तिच्या वक्तव्यामुळे देखील चर्चेत असते. ती प्रचंड स्पष्टवक्ती आहे. ती कोणत्याही मुद्यावर तिचं स्पष्ट मत व्यक्त करत असते. आता राधिकाने नुकतिच एक मुलाखत दिली आहे. या मुलाखतीत तिने नेपोटिझमबद्दल आणि चित्रपट निर्मात्यांबद्दल काही स्पष्ट मत सांगितलं. यावर राधिका म्हणाली की, ज्या अभिनेत्यांना चांगलं काम करायचं आहे, त्यांना सगळ्यात आधी व्यायाम करून शरीर तयार करावं लागतं. यानंतर, त्यांना चांगले कपडे घालण्यापासून ते पापाराझी कॅमेऱ्यात येण्यापर्यंत सर्व गोष्टींकडे बारकाईने लक्ष द्यावे लागेल." पुढे ती म्हणते की, "मात्र स्टार किड्स कोणताही कोर्स किंवा कोचिंग करत नाहीत, कारण त्यांच्यासाठी ते महत्त्वाचे नसते. त्यांना वाटतं की आपण स्टार किड्स आहोत, आपल्याला सर्व काही येतं." "तर दुसरीकडे तो स्टार किड आहे, तो अभिनय करणारचं. जर नसेल करता येत तर आपण करुन घेवू असं चित्रपट निर्मात्यांनाही वाटतं. मला निर्मात्यांचे हे दोन चेहरे पाहिल्यानंतर खुप राग येतो. एकीकडे तुम्ही म्हणता की तुम्ही अभिनय करवून घेणार हा विश्वास तुम्हाला असतो मात्र जेव्हा चित्रपट फ्लॉप होतो तेव्हा तुम्ही कलाकाराला दोषी ठरवतात. वर्क फ्रंटवर बद्दल बोलायचं झालं तर, राधिकाने अनेक प्रकारच्या चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या भूमिका साकारल्या आहेत. राधिकाने आजवर 'बदलापूर', 'हंटर', 'पॅड मॅन', 'पारचड', 'लस्ट स्टोरीज', 'माझी' यासारखे अनेक दर्जेदार चित्रपट केले आहेत. काही दिवसांपुर्वी ती अनुश्री मेहताच्या स्पाय कॉमेडी मिसेस अंडरकव्हरमध्ये दिसली होती.

## कोकण हार्टेड गर्ल मनसेत?

कलाकारांचा राजकारणाकडे कल वाढला आहे. गेल्या काही महिन्यांपासून अनेक मराठी कलाकरांनी राजकीय पक्षात प्रवेश केला आहे. त्यात कालच अभिनेता अभिजीत केळकर याने देखील भाजपात प्रवेश केला. आता त्यातच आणखी एका कलाकाराने राजकारणात येण्याबद्दल हिंट दिली आहे. ती कलाकार म्हणजे अंकिता वालावलकर अंकिता वालावलकर ही कोकण हार्टेड गर्ल म्हणून प्रसिद्ध आहे. अंकिताचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर चर्चेत असतात. अंकिता यु ट्यूबवर सुद्धा सक्रिय असते. अंकिताचे व्हिडीओ चाहत्यांच्या पसंतीस उतरत असतात. तिने केवळ रील स्टार म्हणून लोकप्रियता मिळवलेली नाही तर तिने तिच्या बऱ्याच व्हिडिओतून सामाजासाठी काही तरी करण्याचा प्रयत्न देखील करत असते. तिचे असे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत असतात.अशातच आता अंकिता देखील राजकारणात येण्याचा विचार करतेय असं तिच्या वक्तव्यावरुन दिसतयं. अंकिता वालावलकरने नुकतीच सकाळला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तिच्या राजकारणातील एंट्री बद्दल प्रश्न विचारण्यात आ ला ा होता. त्यावेळी तिने दिलेल्या उत्तराने सर्वांचे लक्ष वेधले आहे. ती म्हणाली, "पहिल्यापासून राजकारणातलं एक व्यक्तिमत्व म्हणजे बाळासाहेब ठाकरे मला फार आवडायचे. त्यानंतर राज ठाकरे हे व्यक्तिमत्व आवडायचं कल असं नाही म्हणता येणार पण आपल्याला कळत ना कोण चांगलं काम करत आणि स्पष्ट बोलतयं मी पहिल्यांदा त्यांच्या घरी गेले त्यामुळे त्यांच्या पक्षाशी जास्त संबंध आला.

## 'आत्महत्येसाठी प्रवृत्त केलं

'बालिका वधू' मालिकेत 'आनंदी' ची भुमिका साकारुन घराघरात पोहचलेली अभिनेत्री प्रत्युषा बॅनर्जीने 1 एप्रिल 2016 साली आत्महत्या करत जगाचा निरोप घेतला. तिच्या या निर्णयानं चाहत्यांना धक्का बसला होता. प्रत्युषाच्या मृत्यूनंतर तिचा लिव्ह इन पार्टनर आणि बॉयफ्रेंड राहुल राज सिंग वर अभिनेत्रीच्या आई-वडिलांनी आरोप केला होता.



# सुपरस्टार नयनतारानं केला मोठा धमाका

साऊथची सुपरस्टार नयनतारा ही सध्या किंग खानच्या जवान चित्रपटामुळे चर्चेत आली आहे. त्यात ती महत्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. यामध्ये नयनतारानं एका महिला पोलीस अधिकाऱ्याची व्यक्तिरेखा साकारली आहे. पठाणनंतर जवान हा शाहरुखचा एक महत्वकांक्षी प्रोजेक्ट असल्याचे सांगितले जाते. आज जवानचा ट्रेलर प्रदर्शित झाला असून त्याला नेटकऱ्यांचा, चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले आहे. अवघ्या काही तासांत तीस लाखांहून अधिक व्ह्यूज या ट्रेलरला मिळाले आहे. यात वेगवेगळ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर जवान हा ट्रेंडिंगचा विषय असल्याचे दिसून आले आहे. त्यात विजय सेतुपति, प्रियामणि, सान्या मल्होत्रा, गिरीजा ओक आणि सुनील ग्रोव्हर यांच्या भूमिका आहे. त्यात नयनताराच्या भूमिकेविषयी वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. ती पहिल्यांदाच शाहरुखसोबत दिसणार आहे. गेल्या काही दिवसांपासून टॉलीवूड विरुद्ध बॉलीवूड असा संघर्ष दिसून येत असून त्यात टॉलीवूडची सरशी झाली आहे. मात्र या वर्षाच्या सुरुवातीला शाहरुखचा जवान रिलिज झाला आणि त्यानं टॉलीवूडला जोरदार टक्कर दिल्याचे दिसून आले आहे. पठाणनं तर देशभरातून एक हजार कोटींची विक्रमी कमाई केली होती. त्यामुळे आता जवानकडून देखील नेटकरी मोठी अपेक्षा करत असल्याचे दिसून येत आहे. त्यात शाहरुखसोबत दीपिका, आलिया आणि नयनतारा ट्रेंडिंगचा विषय आहे. यासगळ्यात नयनतारा पहिल्यांदाच इंस्टावर ॲक्टिव्ह झाल्यानं ती चर्चेचा टॉपिक आहे.

# आता लक्ष्य एकच 90 मीटरचे !

## » विजयी घोडदौड सुरू ठेवण्यासाठी नीरज सज्ज!

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**वर्ल्ड चॅम्पियन बनल्यानंतर अवघ्या चार दिवसांनी नीरज चोप्रासमोर या मोसमात आपली विजयी मालिका सुरू ठेवण्याचे आव्हान आहे. नीरज गुरुवारी डायमंड लीगमध्ये प्रवेश करणार आहे. या मोसमात आतापर्यंत त्याला एकदाही पराभवाचा सामना करावा लागला नाही. नीरज रविवारी बुडापेस्टमध्ये ८८.१७ मीटर भालाफेक करून प्रथमच विश्वविजेता ठरला.**

या मोसमात नीरज फक्त तीन स्पर्धा खेळला आहे. वर्ल्ड चॅम्पियनशिप व्यतिरिक्त, यामध्ये दोहा आणि लॉसनेच्या डायमंड लीग लेगचा समावेश आहे. या तिन्ही स्पर्धेमध्ये नीरजने बाजी मारली आहे. दोहामध्ये त्याने ८८.६७ मीटर भालाफेक केली होती, तर लॉसनेमध्ये त्याने ८७.६६ मीटर भालाफेक करत बाजी मारली होती. या मोसमात नीरजची ही चौथी स्पर्धा असेल. डायमंड लीग स्पर्धेतील भालाफेकमधील ही चौथी आणि अंतिम स्पर्धा आहे. दोन स्पर्धांमध्ये १६ गुणांसह तो तिसऱ्या स्थानावर आहे.

बुडापेस्टमध्ये ८६.६७ मीटरसह कांस्यपदक जिंकणारा झेक प्रजासत्ताकचा जॅकब वडलेजे तीन स्पर्धांमध्ये २१ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे आणि जर्मनीचा ज्युलियन वेबर तीन स्पर्धांमध्ये १९ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. झुरिच लेग नंतर १६ आणि १७ सप्टेंबर रोजी यूजीन (यूएसए) मध्ये डायमंड लीग फायनल होईल. नीरजने गेल्या




वर्षी झुरिचमध्ये डायमंड लेगची फायनल जिंकली होती. यावेळी त्याचा सामना वडलेचे, वेबर आणि माजी विश्वविजेता अँडरसन पीटर्स यांच्याशी आहे.

बुडापेस्टमध्ये रौप्यपदक जिंकणारा पाकिस्तानचा अर्शद नदीम या स्पर्धेत खेळत नाहीये. लीगमध्ये पहिल्या सहा क्रमांकावर असलेले भालाफेकपटू युजीनमध्ये अंतिम सामना खेळतील. नीरज व्यतिरिक्त मुरली श्रीशंकरही लांब उडीत आपला दावा ठोकणार आहे. जागतिक चॅम्पियनशिपमध्ये ७.७४ मीटरसह त्याने चांगली कामगिरी केली नाही आणि तो २२व्या स्थानावर राहिला. मात्र, दोन डायमंड लीग स्पर्धांमध्ये तो १० गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. जागतिक आणि ऑलिम्पिक चॅम्पियन ग्रीसचा मिल्टिआडिस टँटोग्लू २१ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे. श्रीशंकरने या मोसमात ८.४१ मीटर उडी मारली आहे. अंतिम फेरी गाठण्यासाठी त्यांना अशीच कामगिरी करावी लागेल. ऑलिम्पिक आणि जागतिक चॅम्पियनशिप सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा याने बुधवारी झुरिच येथे एक दावा केला आहे. भारत २०२७च्या जागतिक अॅथलेटिक्स चॅम्पियनशिपचे आयोजन करण्यासाठी बोली लावेल, असे तो म्हणाला. डायमंड लीग संमेलनाच्या पूर्वसंध्येला पत्रकार परिषदेत २०२७ मध्ये भारताच्या जागतिक चॅम्पियनशिपचे आयोजन करण्याच्या संधींबद्दल विचारले असता, नीरज म्हणाला, “भारत बोली लावणार आहे. मी चाहत्यांची विनंती करेन की त्यांनी मोठ्या संख्येने सामना पाहण्यासाठी हजेरी लावावी.

### श्रीशंकरही आपला दावा मांडणार आहेत

» नीरज व्यतिरिक्त मुरली श्रीशंकरही लांब उडीत आपला दावा ठोकणार आहे. जागतिक चॅम्पियनशिपमध्ये ७.७४ मीटरसह त्याने चांगली कामगिरी केली नाही आणि तो २२व्या स्थानावर राहिला. मात्र, दोन डायमंड लीग स्पर्धांमध्ये तो १० गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. जागतिक आणि ऑलिम्पिक चॅम्पियन ग्रीसचा मिल्टिआडिस टँटोग्लू २१ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे. श्रीशंकरने या मोसमात ८.४१ मीटर उडी मारली आहे. अंतिम फेरी गाठण्यासाठी त्यांना अशीच कामगिरी करावी लागेल.

# आशिया कपमध्ये पाकिस्तानचा सर्वात मोठा विजय!

## » नेपाळचा 238 धावांनी पराभव, बाबर-इफ्तिखारचे शतक

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या पाकिस्तानने बुधवारी 30 ऑगस्ट रोजी आशिया चषक मोहिमेची धमाकेदार सुरुवात केली. या संघाने सलामीच्या सामन्यात नेपाळचा 238 धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. पाकिस्तानचा या स्पर्धेतील हा सर्वात मोठा विजय आहे.**

मुलतानच्या मैदानावर नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने 50 षटकांत 6 गडी गमावून 342 धावा केल्या. प्रत्युत्तरात नेपाळचा संघ 23.4 षटकांत सर्वबाद 104 धावांवर आटोपला. 151 धावांची खेळी खेळणारा पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम सामनावीर ठरला.

पाकिस्तानच्या विजयाचे हिरो होते कर्णधार बाबर आझम, इफ्तिखार अहमद आणि शादाब खान. पाकिस्तानने नेपाळचा 238 धावांनी पराभव केला. आशिया चषकाच्या इतिहासातील धावांच्या बाबतीत हा दुसरा सर्वात मोठा विजय आहे. सर्वात मोठ्या विजयाचा विक्रम भारताच्या नावावर आहे, या संघाने 2008 मध्ये हाँगकाँगचा 256 धावांनी पराभव केला होता. आशिया कपच्या इतिहासातील हा पाकिस्तानचा सर्वात मोठा विजय आहे. या संघाने यापूर्वी 2000 मध्ये बांगलादेशचा 233 धावांनी पराभव केला होता. पाकिस्तानचा वनडे इतिहासातील हा तिसरा सर्वात मोठा विजय ठरला. या संघाने यापूर्वी 2016 मध्ये आयर्लंडचा 256 धावांनी तर 2018 मध्ये झिम्बाब्वेचा 244 धावांनी पराभव केला होता. आशिया चषकाच्या मंचावर प्रथमच खेळणाऱ्या नेपाळ संघात अनुभवाची लक्षणीय कमतरता होती. संघ तिन्ही विभागात (फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण) निस्तेज दिसत होता. प्रथम क्षेत्ररक्षण करत वेगवान गोलंदाजांनी पाकिस्तानला सुरुवातीचे धक्के



### नेपाळपेक्षा पाकिस्तान सरस होता

» पॉवरप्लेमध्ये दोन्ही संघांनी विकेट्स गमावल्या, पण पाकिस्तानचा संघ नेपाळपेक्षा चांगल्या स्थितीत होता. पॉवरप्लेच्या 10 षटकात 44 धावा करण्यासाठी संघाने दोन विकेट गमावल्या, तर नेपाळने 47 धावा करताना 3 फलंदाज गमावले. दोन्ही संघांची धावगती ४० च्या आसपास राहिली.

दिले, पण मधल्या षटकांमध्ये एकही विकेट घेतली गेली नाही. महत्त्वाच्या प्रसंगी खेळाडूंनी झेलही सोडले. अशा परिस्थितीत जीवनदानाचा फायदा घेत पाकिस्तानी कर्णधार बाबर आझम आणि इफ्तिखार अहमद यांनी शतके झळकावली. या शतकांच्या जोरावर पाकिस्तानने ३४२ धावा केल्या. ३४२ धावांच्या मोठ्या धावसंख्येच्या दडपणाने संघाची आघाडी विस्कळीत झाली आणि कर्णधारासह अव्वल ३ फलंदाज १४ धावांच्या सांघिक धावसंख्येवर पॅव्हेलियनमध्ये परतले. दरम्यान, आरिफ शेखने सोमपाल कामीसोबत अर्धशतकी भागीदारी करत डावावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला, मात्र पाकिस्तानी गोलंदाजांसमोर ही जोडी फार काळ टिकू शकली नाही. आरिफची विकेट पडल्यानंतर सातत्याने विकेट पडू लागल्या आणि संघाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. नेपाळच्या वेगवान गोलंदाजांनी फखर आणि इमामला बाद करून पाकिस्तानवर दबाव आणला होता. संघाने पाकिस्तानी सलामीवीरांना 25 धावांवर पॅव्हेलियनमध्ये पाठवले, पण बाबर-रिजवानने डाव सांभाळला. त्यानंतर नेपाळी गोलंदाजांना मधल्या षटकांमध्ये विकेट घेण्यात अपयश आले. त्यानंतर पाकिस्तानने 342 धावांची मोठी मजल मारली. 343 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या नेपाळच्या संघाची सुरुवात खराब झाली. संघाने 14 धावांच्या स्कोअरवर टॉप-3 विकेट गमावल्या. अशा स्थितीत संपूर्ण दडपण मधल्या फळीवर आले, आरीफ शेख आणि सोमपाल कामी यांनी क्रीझवर थोडा वेळ घालवला असला तरी तो पुरेसा नव्हता. खालच्या मधल्या फळीतील अष्टपैलू खेळाडूंनाही चांगली कामगिरी करता आली नाही. जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या पाकिस्तानने बुधवारी 30 ऑगस्ट रोजी आशिया चषक मोहिमेची धमाकेदार सुरुवात केली. या संघाने सलामीच्या सामन्यात नेपाळचा 238 धावांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. पाकिस्तानचा या स्पर्धेतील हा सर्वात मोठा विजय आहे.

पाकिस्तानच्या जागतिक दर्जाच्या वेगवान आक्रमणाविरुद्ध नेपाळचे फलंदाज झगडताना दिसले. आरिफ, सोमपाल आणि गुलशन यांच्याशिवाय इतर कोणताही फलंदाज दुहेरी आकडी धावसंख्या गाठू शकला नाही यावरून याचा अंदाज लावता येतो.